अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्तः प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# सहाराचा असाही दुसरा चेहरा

सामान्य गुंतवणूकदारांची फसवणूक करणारे कितीतरी सुब्रतो रॉय देशाच्या अनेक भागांत पसरलेले आहेत. आज त्यांच्याविरुध्द कोणीही तक्रार केलेली नाही म्हणून बाकीचे लोक उजळमाथ्याने फिरत आहेत. गडगंज संपत्ती असलेल्या सहारा उद्योग समूहाचे प्रमुख सुब्रतो रॉय यांना झालेली अटक देशभरात उघडपणे चालणाऱ्या फसवणूक प्रकरणावर प्रकाश टाकणारी ठरते. देशातल्या थोड्याथोडक्या नव्हे तर लाखो लोकांची तब्बल २७ हजार कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवला गेला आहे. खरेतर हे प्रकरण अनेक वर्षांपासून सुरू आहे. परंतु त्यांच्यावर कारवाई व्हायला एवढा उशीर तरी का लागावा हे एक कोडे ठरते. आता त्यांना अटक करून सहारा समूहाचा गैरकारभार उघड झाला आहे. सहारा हे नाव मोठ्या अभिमानाने मिरवणारे रॉय हे इतके दिवस गैरव्यवहाराचा सहारा घेऊन गुंतवणूकदारांना बेसहारा करीत होते. आता मात्र ते स्वत:च बेसहारा झाल्यासारखी स्थिती आहे. एक बेचारा एक बेसहारा अशी त्यांची आजची स्थिती असली तरी त्यांच्या चेहऱ्यावर आपण केलेल्या गैरकारभाराविषयी फारशी खंत दिसत नव्हती. त्यांनी वेगवेगळ्या योजना राबवून लोकांकडून पैसे जमा केले. परंतु त्यांची योग्य ती माहिती आणि परवानगी सेबीसारख्या संस्थांकडून घेतली नाही. त्यांना अंधारात ठेवून बिनधास्तपणे आपले उपद्व्याप चालू ठेवले होते. सेबीने त्यांना यासंदर्भात वेळोवेळी जागेही केले होते. परंतु आपल्याला कशाचाच धोका नाही अशी एक गुर्मी त्यांच्यामध्ये निर्माण झाली होती. ज्यावेळेला त्यांना आपला खेळ संपला आहे याची जाणीव झाली त्यावेळेला आपली अटक टाळण्याकरिता इकडे-तिकडे लपण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांच्या घरासमोर पोलिसांनी तब्बल सात-तास पहारा देऊन अखेरीस त्यांना अटक केली. सुब्रतो रॉय यांच्यासारख्या बड्या धनाढ्याला अटक होण्याचा हा तसा पहिलाच प्रयत्न म्हणावा लागेल. परंतु या पध्दतीने अब्जावधी रुपयांची लूट करणारे अजूनही पोलिसांना आणि सरकारला गुंगारा देत आहेत. अशा लोकांची यादी काढली तर त्यांच्याकडे किती प्रचंड संपत्ती साठवलेली आहे हेदेखील आढळून येईल.

### कारवाईला एवढा उशीर का?

तसे पाहिले तर सरकारी पातळीवर जे काही घोटाळे झाले, ती बड्या भांडवलदारांचीच कारस्थाने होती. परंतु गुंतवणूकदारांचे पैसे घ्यायचे आणि त्यांच्या मोबदल्यात गुंतवणूकदारांना कोणताच लाभ घायचा नाही अशी बेपर्वाई दाखवणारे असंख्य भांडवलदार सहजपणे सापडतील. अगदी काही दिवसांपासून किंगफिशर या एअरलाईन्सचे मालक विजय मल्ल्या यांच्याबाबतही काहीसा असा प्रकार सुरू आहे. बँकांकडून कोट्यवधींचे कर्ज त्यांनी उचलले. परंतु त्याची परतफेड करण्याऐवजी ते बुडविण्याचाच मनसुबा त्यांनी दाखवून दिला. स्टेट बँकेसारख्या मोठ्या संस्थेचेही मोठे कर्ज त्यांनी बुडविले आहे. शेवटी बँकेने त्यांच्या बंगळुरू येथील घरावर जप्ती आणण्याची तयारी सुरू केली आहे. ही सगळी काही मोजकी उदाहरणे आहेत. शेअर मार्केटमध्ये बोगस कंपन्या म्हणून जवळपास २०० कंपन्यांची नावे आढळून आली. त्यांचा कोणताच थांगपत्ता सरकारला आणि शेअर मार्केटला लागू शकलेला नाही. अशा पध्दतीने सामान्य गुंतवणूकदारांचे पैसे घेऊन पलायन करणारे अनेक ठकसेन आढळून येतात. पश्चिम बंगाल, तामिळनाडू या राज्यात तर चिटफंडच्या नावाखाली अगदी गरीब माणसांचीही फसवणूक केली जाते. सहा महिन्यांपूर्वीच पश्चिम बंगालमध्ये चिटफंडचा बराच मोठा घोटाळा आढळून आला. त्यापैकीसुध्दा कोणावरही कारवाई होऊ शकली नाही. एकामागोमाग आर्थिक फसवणुकीचे हे प्रकार घडत आहेत. परंतु ते रोखण्यासाठी सरकारकडे कोणतीही प्रभावी योजना नाही हे सिध्द होते.

### महाराष्ट्रातली अॅम्बी व्हॅली

सहारा हे नाव तसे एकेकाळी नावलौकिक मिळवून होते. उत्तर प्रदेशामध्ये या उद्योग समूहाचे मुख्य कार्य चालते. राजकीय लागेबांधेसुध्दा तितकेच मजबूत असल्यामुळे आपला पसारा पसरविण्यात ते यशस्वी झाले. महाराष्ट्रात लोणावळा जवळची अॅम्बी व्हॅली हा प्रकल्पही याच समुहाचा मानला जातो. अतिशय निसर्गसंपन्न भागात श्रीमंती थाटाचे बंगले बांधण्याचा घाट घातला गेला. विमानासाठी स्वतंत्र धावपट्टी उभारली गेली. अनेक राजकीय नेत्यांना क्रिकेटपटूंना आणि नटनट्यांना फुकटात बंगले देण्याचाही उदारपणा या सुब्रतो रॉय यांनी दाखविला होता. निसर्गाला नख लावणारा हा प्रकल्प असाच तातडीने मंजूर झाला. त्यावेळी एकाही राजकीय नेत्यांने किंवा पर्यावरणवाद्यांनी त्याला विरोध केला नव्हता. लव्हासा प्रकल्पाप्रमाणेच अॅम्बी व्हॅली प्रकल्पानेही अनेक नियमांची मोडतोड केली होती. परंतु आपल्याकडे असलेल्या पैशाच्या जोरावर त्यांनी सगळ्या प्रकारच्या परवानग्या मिळविल्या असाव्यात असाच त्यांचा अर्थ निघतो. प्रामुख्याने सगळ्या पकारच्या क्रिकेट सामन्यांचे पुरस्कर्ता असणारा हा सहारा ग्रुप अशा पध्दतीने पैसा गोळा करीत असेल असे त्यावेळी कोणालाही वाटले नव्हते. सहाराचा हा विद्रुप चेहरा आता नव्याने लोकांसमोर आला आहे. कमी काळात अनेक भांडवलदार श्रीमंत कसे होतात हे या सहारा प्रकरणावरून सहज लक्षात येते. सामान्य माणसाचे पैसे घ्यायचे त्याला वर्षानुवर्ष झुलवत ठेवायचे आणि आपला स्वार्थ साधत राहायचा हे प्रकार गेल्या १५-२० वर्षांत सर्रासपणे सुरू आहेत. या कंपन्यांना सरकारकडून सवलतीच्या दरात लाखो एकराचे भूखंड मिळतात. त्यांच्यासाठी अनेक नियमही बदलले जातात. असा हा सत्ताधारी आणि भांडवलदाराचा संगनम ताचा खेळ चालू राहतो. म्हणूनच सहारासारखे उद्योगसमूह काही वर्षांतच गडगंज संपत्तीचे मालक होतात. सहाराच्या मालकाला झालेली ही अटक गुंतवणूकदारांसाठीसुध्दा एक धडा देणारी ठरणार आहे. विशेष म्हणजे, देशाच्या अनेक भागांमध्ये होणाऱ्या या आर्थिक फसवणुकीच्या संदर्भात अधिक कडक उपायांची आवश्यकता निर्माण झाली आहे. आता असलेल्या कायद्यांना आणि नियमांना न जुमानता अनेक भांडवलदार उद्योगपती आणि धनदांडगे आपला स्वार्थ साधून घेतात. सुटाबुटात राहणारी ही मंडळी स्वत:च्या सभ्यपणाचा फार मोठा देखावा निर्माण करत असतात. प्रत्यक्षात मात्र पैसे कमावण्यासाठी वाटेल त्या थराला जाण्याचा मार्ग ते स्वीकारत असतात.